MHNG100004512017

नियमीत दिवाणी दावा क्र. ७४/२०१७
रविना – विरुध्द – भिमराव

## <u>निशाणी क्र. ३५ वर आदेश</u>
## (पारित दिनांक ५ जुलै, २०२४)

प्रतिवादी यांचा अर्ज व त्यावरील वादी यांचे खुलाशाचे अवलोकन केले. तसेच अभिलेखाचे अवलोकन करुन उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

<u>अर्ज</u> :

२. प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी यांनी 'उलट तपास बंद ' चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन की, सदर दावा प्र. वादी क्र १, म्हणजे प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे वडील बघत आहे. कोरोना काळात प्रतिबंध असल्यामुळे काम बंद झाले. ते ट्रेलरींग काम करायचे. त्यांना उच्च रक्तदाब व वाताचा त्रास होता. त्यांचे वय ६४ वर झाले. त्यांचे कडुन कोणतेही काम होत नाही. तसेच त्यांचे पत्नीचे, ऑगस्ट २२ मध्ये निधन झाले. यामुळे ते आपल्या वकीलांना हजर करु शकले नाही. म्हणुन न्यायालयाने नो क्रॉस चा आदेश पारित केला आहे.

३. उलटतपास घेणे अत्यंत गरजेचा आहे. तसेच, प्र.वादी यांना पुरावा देणे आवश्यक आहे. त्यामुळे उलट तपास नाही चा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. गुणांचा आधारे दावा निकालात काढणे साठी अशी संधी देणे आवश्यक आहे. सबब, दि.१८.०९.२०१९ रोजीचा नो क्रॉस चा आदेश निरस्त होऊन मिळावा, अशी त्यांनी विनंती केली.

<u>खुलासा</u> :

४. प्रस्तुत अर्जावर वादी यांचेतर्फे लेखी खुलासा दाखल करुन हरकत

घेण्यात आली. वादी यांचे कथन की, प्र.वादी ने दि. २७.०२.२०१८ रोजी बयान दाखल केले. वादी तर्फे एक साक्षीदार पुराव्यास घेतले. दि. १७.०४.२०२३ पासुन अंतिम निकालास प्रकरण प्रलंबित आहे. प्र.वादी तर्फे कोणीही हजर नाही. याउलट दरम्यान त्यांनी शेती विक्रीचा सौदा केला होता. त्यानंतर वादीने हि बाब समजताच प्रकरण पुढे चालविणेचे ठरविले. प्र.वादी यांचा शेती विकण्याचा मनसुबा बाहे. अर्ज मंजुर केल्यास प्रकरण प्रलंबित करुन, प्र.वादी शेती विकेल. सबब अर्ज खारीज करावा अशी त्यांनी विनंती केली.

**विवेचन :**

**५.** प्रकरण प्रलंबीत असतांना, मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी टाळेबंदी लागू करण्यात आली होती. त्याचा परिणाम हा न्यायालयीन कामाकाजवर देखील झाला होत. न्यायालयीन कामकाज हे मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी पारीत केलेल्या परिपत्रकान्वये सुरू होते. मा. उच्च न्यायालयाच परिपत्रकान्वये कामकाज हे दिनांक ०२.०८.२०२१ पासून पूर्ववत सुरु झाले आहे.

**६.** युक्तीवाद ऐकून घेऊन प्रकरणाचे अवलोकन केले. वाटणी साठी दाखल केला आहे. सदरचा अर्ज माझे सन्माननीय पुर्वाधिकारी यांनी दिनांक २६.०९.२०१८ रोजी नि.क्र.१५ अन्वये दाव्यात वादमुद्दे निश्चित करण्यात आले. वादी यांचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले. नि.क्र. २१ वर उलट तपास हा बंद केल्याचा दिसुन येतो. वादी यांचे तर्फे साक्षीदार यांचा पुराव्याचे शपथपत्र नि.क्र. २८ अन्वये दाखल आहे. त्यावर देखील दि. २५.०१.२०२१ रोजी उलटतपास बंद केल्याचा दिसुन येतो. वादी यांनी त्यांचा पुरावा दि. ०९.०९.२०२१ रोजी पुरसीस देऊन बंद केला .

**७.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, न्यायालयाने या अगोदर प्रतिवादी यांना वेळोवेळी संधी दिलेली आहे. न्यायालयाने दि.

१८.०९.२०१९,व  दि.६.११.२०१९ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारित केल्याचा दिसुन येतो. अर्जातील नमुद कारण हे प्रतिवादी  क्र. १ हे आजारी असल्याचे व त्यांची पत्नी मयत झाल्याचे नमुद आहे.

८.        वादी यांचा शपथपत्र, त्यावर दि.०८.०७.२०१९ रोजीचा आदेश. साक्षीदार यांचे शपथपत्र यावर आदेश दि.२५.०१.२०२१ रोजी पारित केला आहे. नि.क्र. १ वर आदेश दि.१८.०९.२०१९ रोजी व दि.०६.११.२०१९ रोजी पारित केजा आहे. अर्जातील कारण हे संयुक्तीक व सबळ असेल. परंतु  अर्ज संदिग्ध आहे, त्यावरुन कोणताही बोध होत नाही. याउलट गुतांगुत वाढेल असे दिसुन येते. सबब अभिलेखावरील एकंदरीत परिस्थितीवरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**: आदेश :**

- अर्ज खारीज करण्यात येतो.

सही/-

उमरेड **(रा.भा. डोळे)**

दिनांक : ०५.०७.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड

**<u>: प्रमाणपत्र :</u>**

मी प्रमाणित करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आर.एल. जाधव.

न्यायालयाचे नांव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, उमरेड

पी.डी.एफ. अपलोड केल्याचा दिनांक – ०८.०७.२०२४.

स्वाक्षरीत/–

लघुलेखक श्रेणी –३